# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, राहुरी,
## कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

१००) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १३.०२.२०२६

जिल्हा : धुळे

| मागील आठवड्यातील हवामान (०६/०२/२०२६ ते १२/०२/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (१४/०२/२०२६ ते १८/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०६ | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ | १२ | दिनांक | १४ | १५ | १६ | १७ | १८ |
| | | | | | | | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| | | | | | | | कमाल तापमान (अंसे) | ३४ | ३४ | ३३ | ३१ | ३० |
| | | | | | | | किमान तापमान (अंसे) | १८ | १८ | १९ | १७ | १६ |
| | | | | | | | ढग स्थिती (आकाश) | २ | २ | १ | ० | १ |
| | | | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ६९ | ६५ | ६२ | ६० | ५४ |
| | | | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५४ | ५२ | ४९ | ४९ | ५० |
| | | | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | २ | ४ | ३ | १ | ५ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | १) हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा.<br>२) शेतकरी बंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वतः ची योग्य ती खबरदारी/ काळजी घ्यावी तसेच फवारणी करिता किसान कवच बॉडीसूटचा वापर करावा. |
| संदेश | | उन्हाळी भुईमूग पिकाची पेरणी १५ फेब्रुवारी पूर्वी पूर्ण करून घ्यावी. पेरणीचे वेळी रात्रीचे किमान तापमान १८ अंश सेल्सिअस किंवा त्यापेक्षा जास्त असावे. |
| उन्हाळी भुईमूग | पेरणी | **बियाणे:** भुईमूगाचे वाणनिहाय बियाणे प्रति हेक्टरी खालीलप्रमाणे वापरावे.<br>१०० किलो : फुले चैतन्य (केडीजी-१६०), फुले धनी (जे. एल. १०८५)<br>१२० ते १२५ किलो : फुले उन्नती, फुले भारती, फुले वारणा, फुले मोरणा<br>**बीजप्रक्रीया:** बियाण्यापासून प्रादुर्भाव होणाऱ्या व रोपावस्थेत येणाऱ्या रोगापासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास २.५ ग्रॅम मॅन्कोझेब किंवा ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशक चोळावे. नंतर एक किलो बियाण्यास २५ ग्रॅम रायझोबीयम आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू संवर्धक (घनरूप किंवा द्रवरूप) चोळावे बीजप्रक्रीया केलेले बियाणेसावलीत सुकवून पेरावे.<br>**पेरणी अंतर:** दोन ओळीतील अंतर ३० सें.मी. व दोन रोपातील अंतर १० सें.मी. ठेवावे.<br>**पेरणी:** उन्हाळी हंगामात जमीन ओलवून नंतर वापशावर पाभरीने अथवा टोकण पद्धतीने पेरणी करावी. टोकण पद्धतीने पेरणी केल्यास बियाणे कमी लागुन उगवण चांगली होते. |
| हरभरा | घाटे सुटण्याची अवस्था | <u>मर रोगाचे नियंत्रण</u><br>हरभरा मर रोगाचे यशस्वी नियंत्रण करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. एकदा झाल्यानंतर मर रोग पूर्णपणे बरा होत नाही. त्यामुळे वेळीच रोगग्रस्त झाडांचे निर्मूलन, योग्य पाणी व्यवस्थापन व जैविक रासायनिक उपायांचा समन्वय केल्यास रोगाचा प्रसार रोखता येतो आणि उत्पादनात होणारे मोठे आर्थिक नुकसान निश्चितच टाळता येऊ शकते.<br>रोगग्रस्त व अर्धवट वाळलेली झाडे मुळासकट उपटून शेताबाहेर नष्ट करावीत.<br>शेतात पाणी साचू देऊ नये. गरजेनुसार हलके पाणी द्यावे.<br>ट्रायकोडर्मा व्हिरिडी किंवा ट्रायकोडर्मा हार्झियानम २.५ ते ५ किलो प्रति हेक्टर या प्रमाणे शेणखतात मिसळून ओळींमध्ये द्यावे.<br>ओळींमध्ये नीमकेकचा २५० ते ५०० किलो प्रति हेक्टर प्रमाणात वापर करावा.<br>शेणखत व सेंद्रिय खतांचा वापर वाढवून जमिनीतील उपयुक्त सूक्ष्मजीवांचे संतुलन सुधारावे.<br>चांगला निचरा असलेली जमीन निवडून नत्र खताचा अतिरेक टाळावा.<br>हरभऱ्यानंतर पुढील हंगामापूर्वी ज्वारी, बाजरी, मका यांसारखी पिके घेऊन पीक फेरपालट करावी. |
| हरभरा | घाटे सुटण्याची अवस्था | **<u>घाटे आळीच्या नियंत्रणाकरीताचे शिफारशीत किटकांनाशके</u> (प्रमाण प्रती१० लि. पाणी)**<br>क्लोरोंन्ट्रानिलीप्रोल (४७.८५ टक्के एससी) ०.८३ मिलि<br>क्लोरफेनपायर (२४० ग्रॅम/लि एससी) १६-२० मिलि |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | इमामेक्टीन बेन्झोएट (५ टक्के एसजी) ४.४ ग्रॅम<br>इमामेक्टीन बेन्झोएट (१.९० टक्के ईसी) ७.५ मिलि<br>इंडोक्झाकार्ब (१४.५० टक्के एससी) ८-१० मिलि<br>इंडोक्झाकार्ब (१५.८० टक्के ईसी) ६.६६ मिलि<br>लॅम्बडा सायहॅलोथ्रीन (५ टक्के ईसी) १०-१२ मिलि<br>स्पिनेटोरम (११.७० टक्के एससी) ७.५-९ मिलि<br>क्लोर ॲन्ट्रानीलीप्रोल (५.२ टक्के) + नोव्हॅलुरॉन (८.५ टक्के एससी) ८ मिलि<br>फ्लुबेन्डायअमाइड (८.३३ टक्के) + डेल्टामेथ्रीन (५.५६ टक्के एससी) ५ मिलि<br>नोव्हॅलुरॉन (५.२५ टक्के) + इमामेक्टीन बेन्झोएट (०.९ टक्के एससी) १७.५ मिलि<br>नोव्हॅल्युरॉन (५.२५ टक्के) + इंडोक्झाकार्ब (४.५० टक्के एससी) १६.५-१७.५ मिलि |
| **करडई** | | करडई पिकामध्ये घाटे अळीची अंडी किंवा अळी आढळली तर हेलीओकील ५०० मिली ५०० लिटर पाण्यात प्रती हेक्टरवर फवारणी करावी. तसेच घाटे आळीचे कामगंध सापळे हेक्टरी ५ प्रमाणे लावावेत आणि प्रादुर्भाव ओळखावा. |
| **मका** | **फुलोर्याची अवस्था** | अमेरिकन लष्करी अळीचे नियंत्रण:<br>यांत्रिक पद्धती: अंडीपुंज, समुहातील अळया वेचून राकेलमिश्रित पाण्यात टाकुन नष्ट कराव्यात. सामुहिकरित्या नर पतंग आकर्षित करून मारावेत. अळीचा प्रादुर्भाव लक्ष्यात येण्यासाठी प्रति एकरी चार कामगंध सापळे लावावेत.<br>रासायनिक नियंत्रण:<br>क्लोरँट्रनिलीप्रोल १८.५% एस सी ४० जी.ए.आय./ हेक्टर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५% एस जी ८ ग्रॅम प्रति लि. या प्रमाणात फवारणी करावी. किंवा<br>स्पिनेटोरम ११.७ एस सी ०.५ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. किंवा<br>इमामेक्टीन ५%+ बेन्झोएट ल्युफेनुरॉन ४०% डब्लू.जी.०.२ ग्रॅम किंवा नोव्हालुरॉन ५.२५% + इमामेक्टीन बेंझोएट ०.९% एस सी ३ मिली प्रती लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| **गहू** | **दाणे भरण्याची अवस्था** | गहू पिकास पेरणीनंतर ८० ते ८५ दिवसानंतर दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये वारा शांत असताना पाणी द्यावे जेणेकरून गहू पिक पडणार नाही.<br>गहू पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे, प्रादुर्भाव दिसून येताच मॅन्कोझेब ७५% डब्ल्यु पी ३० ग्रॅम १० लिटर पाण्यातून किंवा टेब्युकोनॅझोल ५०% + टायफ्लोक्झीस्ट्रोबीन २५% डब्ल्यु जी १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| **रब्बी ज्वारी** | **काढणी** | पक्व होत असलेल्या ज्वारी पिकाचे पक्षांपासून संरक्षण करावे. ज्वारीच्या दाण्याच्या टोकाजवळ काळा ठिपका दिसून आल्यास ज्वारीची काढणी करावी व ८ ते १० दिवस कणसे उन्हात वाळवावीत. तदंनतर पिकाची मळणी करुन सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| **सूर्यफुल** | **काढणी** | सूर्यफुल पीक सर्वसाधारणपणे ९० ते ९५ दिवसांमध्ये काढणीसाठी परिपक्व होते. पिकाची पाने वाळल्यानंतर काढणी १२ ते १४% ओलावाअसतानाकणसे विळीने कापून करावी. |
| **रांगडा कांदा** | **काढणी** | रांगडा कांदयाची ५० टक्के माना पडल्यानंतर काढणी करावी.<br>सततची पानाची वाढ चालू असल्यास हलकासा ड्रम फिरवावा व त्यानंतर १५ ते २० दिवसांनी कांदयाची काढणी करावी. काढणी नंतर कांदा ४-५ दिवस पातीसहीत शेतात ओळीत सुकवावा.<br>३ ते ४ से.मी. मान ठेवून पात कापावी.<br>कांदयाची प्रतवारी करुन कांदा विक्रीसाठी पाठवावा. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान :

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : १३.०२.२०२६

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**